आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१४ जून २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून पाच दिवस सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर जाणार

- अहमदाबाद विमान अपघातासारखे प्रकार रोखण्यासाठी उपाय सुचवण्याकरता उच्चस्तरीय समितीची स्थापना/ अपघातातल्या मृतांची संख्या २५४वर

- इस्त्रायली हल्ल्यांच्या प्रत्युत्तरात इराणचे तेल अवीववर क्षेपणास्त्र हल्ले/ उभय राष्ट्रांनी शांतता राखावी असं जागतिक समुदायाचं आवाहन

आणि

- दक्षिण आफ्रिका कसोटी क्रिकेट विश्वविजेतेपदाच्या उंबरठ्यावर

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून पाच दिवस सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सायप्रसचे राष्ट्रपती निकोस क्रिस्टोडोलाइड्स यांच्या निमंत्रणावरून ते उद्या सायप्रसला भेट देतील. या दौऱ्यादरम्यान ते राष्ट्राध्यक्ष क्रिस्टोडोलाइड्स यांच्याशी चर्चा करतील, तसंच लिमासोल इथं उद्योगपतींशी संवाद साधतील. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्या निमंत्रणावरून प्रधानमंत्री मोदी १६ जून रोजी कॅनडाच्या कानानास्किस इथं जी-७ परिषदेत सहभागी होणार आहेत. इथं ते जी-७ देशांच्या नेत्यांशी विविध विषयांवर चर्चा करतील, तसंच परिषदेच्या पार्श्वभूमीवर विविध द्विपक्षीय बैठकाही घेतील. शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी १८ जून रोजी क्रोएशियाला भेट देतील. भारताच्या प्रधानमंत्र्यांनी क्रोएशियाला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे. या दौऱ्यादरम्यान ते क्रोएशियाचे प्रधानमंत्री आंद्रेज प्लेनकोविच यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील, तसंच क्रोएशियाचे राष्ट्राध्यक्ष झोरान मिलानोविच यांचीही ते भेट घेणार आहेत.

<><><><>

अहमदाबाद विमान अपघातानंतर केंद्रसरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाने समाजमाध्यमावर प्रसिद्ध केलेल्या पोस्टमधे म्हटलंय की ही समिती अशा प्रकारच्या दुर्घटना होऊ नयेत याकरता वापरण्याच्या सर्वसामान्य कार्यपद्धतीचा आढावा घेऊन ही समिती मार्गदर्शक सूचना जारी करील. या प्रकरणी चौकशी करणाऱ्या इतर यंत्रणांचं काम सुरुच राहणार असून ही समिती केवळ अपघात प्रतिबंधासाठी शिफारशी करील.

दरम्यान, अपघातग्रस्त विमानाचा फ्लाइट डेटा रेकॉर्डर अर्थात ब्लॅक बॉक्स काल सापडला असून याद्वारे अपघातापूर्वीच्या परिस्थितीवर प्रकाश पडेल अशी अपेक्षा आहे. अपघाताच्या पार्श्वभूमीवर Genx इंजिन असलेल्या बोइंग ७८७ विमानांची अतिरीक्त सुरक्षा चाचणी करण्याचे निर्देश विमान वाहतूक महासंचालकांनी एअर इंडियाला दिले आहेत. मृतदेहांची ओळख पटवण्याचं काम सुरू असून आतापर्यंत डीएनएचे सुमारे २०० नमुने गोळा करण्यात आले आहेत. सात मृतदेह नातेवाईकांकडे सोपवण्यात आले आहेत. अपघातानंतर या भागातल्या काही स्थानिकांचा ठावठिकाणा लागत नसून त्यांचाही शोध घेतला जात आहे. मृतांची संख्या २५४ वर पोहोचली आहे.

गुजरातचे गृह राज्य मंत्री हर्ष सांघवी यांनी आज गांधीनगर न्यायवैद्यक प्रयोगशाळेला भेट देऊन डीएनए तपासणीच्या कामाची पाहणी केली.

**<><><><>**

योग ही भारताची जागतिक कल्याणासाठीची देणगी असल्याचं प्रतिपादन आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. नवी दिल्लीत आज आयोजित केलेल्या ग्लोबल योगा समिट - योगा कनेक्ट कार्यक्रमात ते बोलत होते. धर्म, लिंग, भाषेच्या सीमा ओलांडून योग हा सर्वांसाठी उपलब्ध असल्याचं जाधव यांनी सांगितलं. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत आणि गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांसाठी योग उपयुक्त असल्याचं त्यांनी सांगितलं. सरकारी संस्थेच्या पाहणीनुसार, गेल्या दहा वर्षांत ३३ टक्के नागरिक आंतरराष्ट्रीय योगा दिनात सहभागी झाल्याचं आयुष मंत्री जाधव यांनी नमूद केलं.

- **- - होल्ड- प्रतापराव जाधव - -**

**<><><><>**

शिक्षणक्षेत्राला चालना देण्यासाठी पाच परदेशी विद्यापीठांना त्यांची संकुलं महाराष्ट्रात सुरू करण्याची इरादापत्रं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि इतरांच्या उपस्थितीत आज मुंबईत झालेल्या कार्यक्रमात देण्यात आली. इंग्लंडमधली युनिव्हर्सिटी ऑफ ॲबरडीन, युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क, युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया, अमेरिकेतलं इलिनॉय टेक आणि इटलीचं आयईडी स्कूल ऑफ डिझाइन या संस्था त्यांची संकुलं राज्यात सुरू करणार आहेत. भारतातल्या इंग्लंडच्या उच्चायुक्त लिंडी कॅमेरॉन, ऑस्ट्रेलियाचे मुंबईतले कॉन्सुल जनरल पॉल मर्फी, अमेरिकेचे मुंबईतले कॉन्सूल जनरल माइक हँकी, या पाचही विद्यापीठांचे प्रतिनिधी, सिडको आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अधिकारी आणि इतरही या कार्यक्रमाला उपस्थित आहेत.

**<><><><>**

कैलास मानसरोवरला जाणाऱ्या यात्रेकरूंची पहिली तुकडी उद्या सिक्कीमची राजधानी गंगटोक इथं पोहोचेल. सिक्कीम सरकारनं यात्रेकरूंच्या स्वागताची सर्व तयारी केली आहे. तब्बल पाच वर्षांनंतर सिक्कीम मार्गे कैलास मानसरोवर यात्रेला प्रारंभ होत आहे.

२० जूनपासून यात्रेला सुरू होणार असून नाथू खिंडीतून रवाना होणाऱ्या यात्रेकरूंच्या पहिल्या तुकडीला मुख्यमंत्री प्रेम सिंह तमांग हिरवा झेंडा दाखवणार असल्याची माहिती सिक्कीमच्या पर्यटन आणि नागरी उड्डाण विभागाचे अप्पर मुख्य सचिव सी एस राव यांनी दिली. पहिल्या तुकडीत ३५ यात्रेकरू आहेत. यात्रेकरूंची आवश्यक ती आरोग्य तपासणी केली जाईल तसंच त्यांना वैद्यकीय सामुग्री देण्यात येणार असल्याचंही राव यांनी सांगितलं.

**<><><><>**

इस्रायलनं इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर, इराणनं प्रत्युत्तरादाखल इस्रायलची राजधानी तेल अवीवला लक्ष्य करत क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत. या हल्ल्यात एकाचा मृत्यू झाला तर २० जण जखमी झाल्याचं इस्रायलच्या आपत्कालीन सेवा विभागानं म्हटलं आहे.

या हल्ल्यांनंतर अमेरिकेनं इस्रायलला हवाई संरक्षण प्रणालीसह, नौदलाच्या विनाशिकेची मदत पुरवली असल्याचं वृत्त अमेरिकेच्या प्रसारमाध्यमांनी दिलं आहे. याशिवाय अमेरिकेची लढाऊ विमानंही गस्त घालत असल्याचं वृत्त आहे.

दरम्यान, इस्त्रायलनं इराणवर केलेला हल्ला पूर्वनियोजित होता, आणि त्याला अमेरिकेचं पाठबळ होतं असा आरोप संयुक्त राष्ट्र संघातले इराणचे स्थायी प्रतिनिधी, अमीर सईद इरावाणी यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत केला. इस्त्रायलच्या या हल्ल्यात किमान ७८ जण ठार झाल्याचा तर ३२० जण जखमी झाल्याचा दावाही त्यांनी केला.

इस्त्रायल आणि इराणमध्ये सुरू झालेल्या या संघर्षानंतर जगभरातून प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दोन्ही देशांनी परस्परांविरोधातल्या कारवाया थांबवाव्यात आणि शांततापूर्ण वाटाघाटींच्या मार्गानं तोडगा काढावा असं आवाहन संयुक्त राष्ट्र संघाचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी केलं आहे.

युरोपीय संघ आयोगाच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांनी इस्त्रायलला स्वसंरक्षणाचा अधिकार असल्याचं म्हटलं आहे. तसंच दोन्ही देशांनी संयम बाळगावा असं आवाहन केलं आहे.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी इस्त्रायलची कृती ही संयुक्त राष्ट्रांच्या जाहिरनाम्याचं उल्लंघन असल्याचं म्हणत, मृतांबद्दल शोक व्यक्त केला आहे. पुतीन यांनी दोन्ही देशांच्या प्रमुखांशी यासंबंधी चर्चा केल्याचं क्रेमलिनमधे प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांनी इराणचा अणुकार्यक्रम दीर्घकाळापासून गंभीर चिंतेचं कारण बनला असल्याचं म्हटलं असून, इस्त्रायलच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणनं केलेला क्षेपणास्त्र हल्ला हा या क्षेत्रातल्या शांततेला धोका असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><>**

इस्त्रायल - इराणमध्ये संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिक तसंच भारतीय वंशाच्या व्यक्तींनी मदतीसाठी तिथल्या भारतीय दूतावासाच्या आपत्कालीन संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा असं आवाहन परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं केलं आहे. यासाठी मंत्रालयानं +98 9128109115 आणि +98 9128109109 हे संपर्क क्रमांकही जारी केले आहेत.

इराणमधल्या भारतीयांनी अनावश्यक प्रवास टाळावा, भारतीय दूतावासाने तसंच स्थानिक अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या सुरक्षा नियमांचं पालन करावं असं आवाहन करणारी मार्गदर्शक सूचनाही इराणमधल्या भारतीय दूतावासानं जारी केली आहे.

**<><><><>**

जागतिक क्रिकेट कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा संघ विजयाकडे वाटचाल करत आहे. सामन्याचा दोन दिवसांचा खेळ अजून शिल्लक असून, दक्षिण आफ्रिका आपल्या दुसऱ्या डावात विजयापासून केवळ ६९ धावा दूर आहे. काल सामन्याच्या तिसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेनं ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव २०७ धावांवर रोखला. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियानं ७४ धावांची आघाडी घेतली होती. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेला दुसऱ्या डावात विजयासाठी २८२ धावांचं लक्ष्य मिळालं. त्याचा पाठलाग करताना आफ्रिकेचा सलामीवीर रिकल्टन अवघ्या सहा धावा करून माघारी परतला. मात्र त्यानंतर शतकवीर एडन मार्करम यानं आधी मल्डर याच्यासोबत अर्धशतकी, तर त्यानंतर कर्णधार बवुमा सोबत नाबाद शतकी भागिदारी करत दक्षिण आफ्रिकेला विजयाच्या उंबरठ्यावर आणलं आहे.

तिसऱ्या दिवस अखेरीस दक्षिण आफ्रिकेनं २ बाद २१३ धावा केल्या असून मार्करम १०२ आणि बवुमा ६५ धावा करून खेळपट्टीवर टिकून आहेत.

**<><><><>**

जर्मनीच्या म्युनिक इथं सुरू असलेल्या ISSF विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत भारताच्या सुरुची सिंह हिनं महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल स्पर्धेत अंतीम फेरीत सुवर्ण पदक पटकावलं. काल झालेल्या सामन्यात सुरुचीनं फ्रान्सच्या कॅमिली हिला पराभूत केलं.

या आठवड्याच्या प्रारंभी झालेल्या रायफल स्पर्धेत एलावेनिल वलारिवन आणि सिफ्त कौर समरा यांनी कांस्य पदक जिंकलं. या स्पर्धेत भारताच्या खात्यात तीन पदक असून पदक तालिकेत पाचव्या क्रमांकावर आहे. तीन सुवर्ण आणि दोन कांस्य पदक मिळवत चीन अग्रस्थानी आहे.

**//<><><><>//**